# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/07/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## घरफोडी

पो.स्टे. कोंढाळी :- अंतर्गत ०१ किमी अंतरावर शनीचरापेठ कोंढाळी येथे दिनांक ०५/०७/२०२३ चे १५.०० वा. ते दिनांक ०७/०७/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- विकास त्र्यंबकराव भोयटे, वय ६० वर्ष, रा. शनीचरापेठ कोंढाळी हा आपले पत्नीसह आपले घराला कुलुप लावुन नागपुर येथे गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घरातील गोदरेज कंपनीचे लोखंडी कपाटात ठेवलेले नगदी २०,०००/- रू. ज्यात ५००/- रू. च्या ४०/-रू. नोटा चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार भोजराज तांदुळकर ब. नं ५०६ पोस्टे कोंढाळी मो. नं. ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील घोगली शिवार येथे दिनांक ०१/०६/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक ०४/०७/२०२३ चे ०५.०० वा दरम्यान फिर्यादी नामे- निखिल बाळकृष्ण वानखेडे, ३८ वर्ष, रा. प्लॉट नंबर २० अंजनी निवास विद्यानगर कोराडी रोड नागपूर यांची शेती घोगली शिवारात असून त्या शेतीमध्ये दुधारू जनावर तसेच सेंट्रींग कंस्ट्रक्शनचे मटेरियल शेतात टीनाचे कंपाउंड मध्ये ठेवले होते. त्या सेंट्रींग साहित्यापैकी काही साहित्य १-४५ नग लोखंडी यु हेड जॉब प्रत्येकी ३०९/- रुपये प्रमाणे एकूण १३,५००/- रुपये २) २५० नग लोखंडी सिकंदर प्रत्येकी अंदाजे दोनशे रुपये प्रमाणे एकूण किंमती ५०,०००/- रुपये ३) दहा नग लोखंडी गोल प्लेटा अंदाजे प्रत्येकी किंमती ५००/- रुपये प्रमाणे एकूण किंमती ५०००/- रुपये असा एकूण ६८,५००/- रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राऊत मो. नं. ८५५४९६७९४०

हे करीत आहे.

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत पोस्टे पॉईट भिवापुर येथे दिनांक ०७/०७/२०२३ चे १०.५४ वा. दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन गोपनीय खबर मिळाली की, एक इसम टिप्पर व्दारे रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी दरम्यान टिप्पर वाहन १० चाकी क्र. एम. एच.—४०/ए. के.— ७३०१ चा चालक संशयीत **आरोपी नामे —अमोल कुंडलीक सयाग, रा. खैरी दिवान ता. पवनी जि. भंडारा** या वाहन चालकाने विनापरवाना अवैधरीत्या टिप्पर वाहन १० चाकी क्र. एम. एच.—४०/ए. के.— ७३०१ ची किंमती २०,००,०००/— रूपये व त्यामध्ये मध्ये विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून रेती अंदाजे ०५ ब्रास रेती किंमती अंदाजे २५,०००/— रूपयाचा मुद्देमाल असा एकुण वाहनासह २०,२५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोहवा १३९५ राकेश त्रिपाठी रा. पोस्टे भिवापुर यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार धात्रक मो. नं. ९५४५३५५४७० पोस्टे भिवापुर हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०३/०७/२०२३ चे २०.०० वा. ते २०.१५ वा. दरम्यान फिर्यादी ही तिचे मोहल्ल्यात राहणाऱ्या महिलेच्या घरी तिचे सोबत बोलायला गेली होती. तासभर तिच्यासोबत गप्पागोष्टी करून रात्री अंदाजे ०८/०० वा. सूमारास महिलेच्या घरून फिर्यादी आपल्या घरी येण्यासाठी निघाली असता रस्त्यामधिल मंदीर जवळ मनोज हावरे हा रोडवर फिर्यादीला भेटला. त्याने फिर्यादीचा हात पकडला व ‘‘तू माझेसोबत लग्न कर नाहीतर जिवाने मारून टाकीन’’ असे म्हटलें. तेव्हा फिर्यादीने त्याचा हात झटकून तेथून पळत घरी आली. तेव्हा मनोज हावरे हा फिर्यादीचे मागे मागे तिचा पाठलाग करीत घरापर्यंत आला. तेव्हा फिर्यादीने घरी येवून तिच्या आईला झालेली सर्व घटना सांगितली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (ड) भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१६७८ भूक्ते मो. क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर